BHARATI INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY
RESEARCH & DEVELOPMENT (BIJMRD)
(Open Access Peer-Reviewed International Journal)
DOI Link : https://doi.org/10.70798/Bijmrd/04041016
Available Online: www.bijmrd.com | BIJMRD Volume: 4 | Issue: 04(1) | April 2026 | e-ISSN: 2584-1890

# मराठी साहित्याचे विकसित दालन

**डॉ. हिराजी बनपूरकर**

प्राचार्य, केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

**सारांश:**

*"मराठी साहित्याचे विकसित दालन" या लेखात मराठी साहित्याची व्यापक आणि समृद्ध परंपरा उलगडली आहे. संतकाव्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत विविध प्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. ज्ञानदेव, तुकाराम यांसारख्या संतांनी भक्तिकाव्याद्वारे अध्यात्म मांडले, तर महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनी सामाजिक परिवर्तन घडवले. कादंबरी, कविता, नाटक आणि कथा या साहित्यप्रकारांनी समाजातील वास्तव, भावना आणि विचार प्रभावीपणे मांडले.*

*कादंबरी प्रकाराने सामाजिक प्रश्न आणि मानवी जीवनाचे वास्तव चित्रण केले, तर कवितेने संवेदनशीलता आणि युगधर्म व्यक्त केला. नाटकांनी लोकाभिरुची आणि सामाजिक परिवर्तन यांचा समतोल साधला. कथांनी मानवी मनातील सूक्ष्म भावनांचे चित्रण केले.*

*तथापि, बहुजन, ग्रामीण आणि दलित समाजाचे वास्तव पूर्णपणे प्रतिबिंबित झाले नाही, ही उणीवही लेखात अधोरेखित केली आहे. मराठी साहित्य समृद्ध, प्रगल्भ आणि वैचारिकदृष्ट्या सक्षम असले तरी सर्वसामान्यांच्या जीवनाचे संपूर्ण प्रतिनिधित्व करण्यात काही मर्यादा दिसतात.*

*एकूणच, मराठी साहित्य हे विविध कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक बदलांचे प्रभावी प्रतिबिंब असून, ते सतत विकसित होत राहिलेले एक समृद्ध दालन आहे.*

**बीज शब्द:** *मराठी साहित्य, कादंबरी, कविता, नाटक, सामाजिक परिवर्तन*

मराठी साहित्याचे विकसित दालन म्हणजे ज्ञानदेवांच्या भक्तिकाव्यापासून ते फुले-आंबेडकरवादी साहित्य, दलित साहित्य, आणि आधुनिक काळातील कथा, कादंबरी, कविता, नाटक, निबंध, पत्रकारिता अशा विविध साहित्यप्रकारानी समृद्ध झालेला मराठी साहित्यसंग्रह होय, ज्यामध्ये संत-कवी, समाजसुधारक, लेखक आणि पत्रकार यांनी सामाजिक, अध्यात्मिक व वैचारिक बदलांना साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्ती दिली आहे. या दालनात धार्मिक साहित्य (ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम), सामाजिक सुधारणांवर आधारित लेखन (ज्योतिराव फुले), आणि स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्य, ग्रामीण साहित्य, झाडीबोली साहित्य यांचा समावेश आहे.

गेल्या शतकभरातील मराठी साहित्याकडे वळून पाहताना साहित्याबद्दलची एक संकल्पना मनाशी ठरवली, ती वरीलप्रमाणे. साहित्य म्हणजे रसिकाचा आनंद इथपासून रा. रा. भालचंद्र नेमाड्यांच्या देशीयतेपर्यंतच्या साहित्य समीक्षेच्या निकषांची उत्क्रांती लक्षात घेऊन साहित्याची अशी वास्तववादी संकल्पना घेऊनच गेल्या शतकातल्या साहित्याकडे नजर टाकावी लागते. नाहीतर मग हाती उरतात आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासाचे अनेक जाडजूड खंड बाकी काही नाही.

**कादंबरीच्या कोसल्यात**

कादंबरी हा प्रकार वगळला तर कविता, नाटक आणि चरित्रात्मक वाङ्मयाला कित्येक शतकांची परंपरा लाभली. ती या मातीतीलच. मग ती संस्कृत असो की प्राकृत. यमुना पर्यटन ही 1857 साली प्रसिद्ध झालेले कादंबरी मराठीतीलच नव्हे तर भारतीय भाषांमधील पहिली कादंबरी होती. महात्मा फुले, आगरकर, कर्वे आणि रानडे ज्या प्रबोधन भूमीत ठामपणे उभे राहिले, त्या भूमीवरच कादंबरी सारखा वास्तववादी प्रकार प्रथम जन्माला यावा हा निव्वळ योगायोग नव्हे! आणि देशातील पहिलीच कादंबरी विधवांच्या दुःखाला वाचा फोडणारी, तोही बाबा पदमनजी यांच्यासारख्या धर्मांतरित ख्रिश्चन लेखकाने लिहावी हाही योगायोग नव्हे. भालचंद्र नेमाडे म्हणतात, तसा हा अस्वस्थ आंग्ल संस्कृतीच्या संयोगातून गद्य वाङ्मयाच्या रूपात झालेला सांस्कृतिक व्यवहार होय.

आधुनिक महाकाव्याचे रूप धारण करणाऱ्या कादंबरीने विसाव्या शतकात मराठी भाषेत केलेली कामगिरी पूर्णपणे यशस्वी नसली तरी समाधानकारक आहे. मानवी मनाच्या खोल डोहात डोकावणारी आणि आकाशाएवढ्या विशाल दृष्टीची शरदबाबूंची बंगाली कादंबरी हा मानदंड समोर असूनही मराठी कादंबरी फडके, खांडेकर, माडखोलकर, वरेरकर, असा प्रवास करीत जयवंत दळवीच्या चक्र पुढे गेलाच नाही. मराठी कादंबरीच्या या मुख्य प्रवाहामध्ये धग (उद्धव ज. शेळके), पाचोळा (रा. रं. बोराडे), माणूस (मनोहर तल्हार) आणि कोसला (भालचंद्र नेमाडे) यासारखे मैलाचे दगड आढळतात, पण त्यांची संख्या कमीच. लोकप्रियता, खप आणि समीक्षा यांचा विचार केल्यास या कादंबऱ्या आडवळणाच्या ठराव्या. ययाती सारखे राष्ट्रीय पुरस्कार नाहीत, मृत्युंजय सारखे खपाचे उच्चान्क नाहीत, की स्वामी सारख्या कसलेल्या समीक्षकांचा वरदहस्त नाही. पण खऱ्या मराठी माणसाला कवेत घेण्याचा प्रयत्न केला तो अशा आडवळणाच्या कादंबरीकारानीच.

अरुण साधू (सिंहासन, मुंबई दिनांक), भाऊ पाध्ये (वासूनाका राडा), अण्णाभाऊ साठे (फकीरा) आनंद यादव (गोतावळा) ह. मो. मराठे (निष्पर्ण वृक्षावर) या लेखकांनी मराठी मनाच्या जाणिवा विस्तारल्या. अवतीभवतीच्या जीवनाचे वास्तववादी भिंगातून साक्षात्कारी दर्शन झाल्यावर कादंबरीच्या रूपाचा महाकाव्यसदृश आवाका लक्षात आला. एवढेच नव्हे तर एकूणच साहित्याच्या सांस्कृतिक जबाबदारीचे गांभीर्यही या कादंबऱ्यामुळे लक्षात आले.

पौराणिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांची एक मोठी लाट 1960 नंतर मराठी झाली. ह. ना. आपटे किंवा नाथमाधव यांच्या ऐतिहासिक कादंबरीतील राष्ट्रधर्म अशा कादंबऱ्यात नव्हता. ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे भावनिक उदात्तीकरण आणि कर्तुत्ववान व्यक्तिमत्त्वाचे मानवीकरण मृत्युंजय आणि स्वामी अशा कादंबऱ्यात दिसून येते. पण याचवेळी शिक्षणाचे होत असलेले सार्वत्रिकरण, बहुजनांचा सांस्कृतिक व राजकीय क्षितिजावरील उदय आणि दलित, ग्रामीण व आदिवासींच्या उत्थानाची गरज याकडे मराठी सारस्वतांचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले दिसते. मराठी कादंबरीत अतिवास्तववाद किंवा रुपवादी समीक्षेचा आधार बनलेल्या तत्वप्रणालींना समोर ठेवून कादंबरी लेखन झाले. पण सभोवतालची आपली माती आपली माणसे यांचाच विसर पडला. म्हणून विश्वास पाटील यांच्या झाडाझडतीला जो प्रतिसाद मिळाला, तो पनिपत किंवा महानायकला मिळणे शक्यच नव्हते. थोडक्यात शतकातील कादंबरीकार म्हणून नेमाडे, शेळके, यादव, माडगूळकर, दळवी व अरुण साधू यांचाच उल्लेख करावा लागतो.

कविता म्हणजे मानवी भाषेतील शब्दांच्या सर्वोच्च सामर्थ्याचा प्रत्यय. कविता म्हणजे युगायुगाच्या प्रवाहित संस्कृतीचा हुंकार. कविता म्हणजे स्पंदनशील मनुष्यत्वाची साक्ष. अशा कविता या प्रकाराने मराठी भाषिक संस्कृतीला काय दिले आणि मराठी भाषिक संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवींनी गेल्या शतकातील कवितेला कसे घडविले, असा परस्परविरुद्ध प्रश्न डोळयासमोर ठेवून पाहिले तर काय दिसते?

**तुतारी ते संध्याकाळच्या कविता..**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात केशवसुतांनी फुंकलेल्या तुतारीचे पडसाद दसरा (गोविंदाग्रज), धर्मवीर (बालकवी), रणशिंग (टिळक) व डंका (बी) या रूपात विसाव्या शतकातही उमटले. गोविंदाग्रज, बालकवी, यशवंत, गिरीश यांच्यापासून तर रविकिरण मंडळापर्यंत, विसाव्या शतकातील मराठी कवितेवर रोमॅंटीसिझम चा प्रभाव दिसतो. सरंजामशाही, भांडवलशाही, पुरोहितशाही याविरुद्ध संपूर्ण जगात सुरू असलेल्या चळवळीची ती व्यक्तिवादी संवेदनशील प्रतिक्रिया होती.

राष्ट्रवादी वैचारिकता विनायक दामोदर सावरकर यांच्या कवितेतून व्यक्तिगत पातळीवरील अनुभवाच्या स्फोटासारखी प्रज्वलित झाली होती. कवी अनिल आणि कुसुमाग्रज यांनी पुढे याच ज्वालामुखीवर आपल्या मशाली पेटविल्या. भा. रा. तांबे आणि कवी बी या कवींनी भावनांच्या सप्तरंगी छटांना नाट्यरूप देत भारतीय संस्कृतीमधील चैतन्यरूप आणि अद्वैतवादी तत्त्वांचा केलेला विलक्षण आविष्कार हा गेल्या शतकातील मराठी कवितेतील अभिमानास्पद ठेवा आहे. अनिलांचा मानवतावाद आणि कुसुमाग्रजांचा सामाजिक क्रांतिवीर अधिक प्रगल्भ झाला तो बापट, पाडगावकर आणि करंदीकरांच्या रूपाने. समाजवादी चळवळ, उदात्त भावनिक संबंध आणि स्थानिक जीवनाशी असलेली वैश्विक मूल्यांची विसंगती ही अनुभूती निरकस शैलीत बापट ते करंदीकर अशा चढत्या क्रमाने व्यक्त झाली.

पण विसाव्या शतकात मानवी चेहरा आमुलाग्र बदलून टाकणाऱ्या महायुद्धजन्य वास्तवाला मराठी कविता विमुख होऊच शकत नव्हती. मर्ढेकर नामक नवकवीच्या रूपाने परिस्थितीचे जहाल ऍसिड मराठी कविता प्राशन करणे अपरिहार्यच होते. बाळ सिताराम मर्ढेकर यांची कविता, कवितेकडे पाहण्याचा काव्यमय दृष्टिकोन बदलून टाकणारी ठरली. बडवित टिर्या अर्धपोट अन अशा भयान वास्तवाला एक जाणीव म्हणून पेलणारी मर्ढेकरी कविता, कविता म्हणजे आकाशीची वीज हे केशवसुताचे म्हणणे सार्थ करणारी ठरली. त्या प्रभावात पु. शि. रेगे, इंदिरासंत, बा. भ. बोरकर यांचे भावकाव्य केवळ रमणीय ठरले.

केशवसुत, करंदीकरांच्या रोमॅंटिसिझम ते वास्तववादी प्रवासाला व्यापक समूहाचा गंध दिला, तो नारायण सुर्वे यांनी. डायरीच्या गुलाबी पानावरून कविता मिल मजुरांच्या जाहीरनाम्यावर उतरल्या आणि मर्ढेकरांची नवकविता दिलीप पुरुषोत्तम चित्रे, नामदेव ढसाळ या यामार्गे वसंत आबाजी डहाकेपर्यंत आली. मध्येच या कवितेच्या फांद्या ना. धों महानोरांच्या रानातल्या कवितेत गुंतल्या गेल्या, तर दुसरीकडे दया पवार, यशवंत मनोहरांच्या विद्रोही कविता गावकुसाबाहेर पसरल्या. सुरेश भट आणि विठ्ठल वाघ यांनाही त्यांच्या शब्दाचे मोहोळ, दिल्लीचे राजकारण आणि गावगाड्यातील दुष्काळ या संदर्भात उठवावे लागले. संस्कृतीच्या प्रवाहात समूहजाणिवेचे आदिम झरे ग्रेसच्या गूढ काव्यालयात तरंगताना दिसतात. मराठी माणसाच्या संदर्भापलीकडे जाणारी त्यांची कविता शब्दांचे सामर्थ्य प्रदर्शित करते, संवेदनेचे हे एक कोडेच आहे. मात्र विश्वाच्या अफाट पसार्यात जोमदार जाणिवांचे प्रवाह जीवाच्या आकांताने खेचून ते पेलवण्याचे आश्चर्यकारक कार्य विसाव्या शतकातील मराठी कवितेने केले आहे, हे निश्चित.

**गडकरी ते एलकुंचवार : एक नाट्ययात्रा**

कलाकृती आणि लोकाभिरुची यांच्यातील भिंत दूर करणारा साहित्यातील सर्वात कठीण प्रयोग म्हणजे नाटकाचा. शेक्सपियर व कालिदासांच्या नाट्यकृतीचा आस्वाद घेत असलेला अभिजन रसिक आणि संत-शाहीरांच्या उत्कट लोकनाट्याशी एकरूप झालेले बहुजन या अनेक दृष्टीने टोकावर असलेल्या प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटक सादर करणे म्हणजे खऱ्या अर्थाने मानवी प्रतिभेला आव्हान असते. पण ते मराठी नाटककारांनी पेलले. गो. ब. देवलांचे शारदा नाटक मराठी कादंबरीप्रमाणेच परिवर्तनाच्या प्रवाहाची ताकद घेऊन आले होते. लोकाभिरूची, लोकश्रद्धा यांचा तोल सांभाळात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी राष्ट्र व समाज या सुप्त केंद्रका भोवती जी नाट्य रचली ती पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा निर्माण करणारी ठरली.

नाटकातील संगती आणि भरतमुनीचे नवरस या घटकांना प्राधान्य देऊन ही मराठी रंगभूमी विसाव्या शतकात श्रीमंत केली ती राम गणेश गडकरी यांनी. शोकांतिकेचा प्रेक्षक हा सर्वार्थाने माणूस असतो, तो अभिजन, बहुजन असा नसतो हे सिद्ध केले. गडकऱ्यांच्या एकच प्याला ने विसाव्या शतकातील मराठी साहित्यातील एक आश्चर्य म्हणजे राम गणेश गडकरी होय. नंतर फ्रेंच, जर्मनांकडून इंग्रजीमार्फत मराठीत आलेला अतिवास्तववाद आणि व्यस्ततावाद (अब्सर्ड थिएटर) यांची सुप्त बीजे गडकऱ्यांच्या काही नाटकात कशी दिसतात, हा जागतिक पातळीवरील संशोधनाचा एक विषय ठरला. आंधळयांची शाळा त्यांच्या (श्री. वि. वर्तक) ने उध्वस्त धर्मशाळा (गो. पु. देशपांडे) हा मराठी नाटकातील एक समांतर प्रवाह आहे.

बौद्धिक उत्क्रांतीची स्पंदने भारतीय आणि मराठी मातीच्या पार्श्वभूमीवर नाटकासारख्या प्रकारात टिपण्याचे असे कार्य सुरू असतानाच ऐतिहासिक घटनांना भावनात्मक आव्हानाचे रूप काही नाटककार देत होते. रायगडला 'जेव्हा जाग येते' या कानेटकरांच्या नाटकाला प्रयोगाचे एक प्रांतिक परिमाण होते, तर शिरवाडकरांच्या नटसम्राट पाशी थांबलेल्या मराठी

रंगभूमीला खऱ्या अर्थाने प्रौढ केले. विजय तेंडुलकर यांच्या 'गिधाडांनी', 'शांतता कोर्ट चालू आहे' ते सतीश आडेकरांचे महानिर्वाण हा मराठी रंगभूमीवरचा थक्क करणारा प्रवास आहे.

या प्रवासात प्र. के. अत्रे यांचे 'घराबाहेर' आणि पु. ल. देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी' ही नाटके मध्यंतरासारखी नाहीत. महाराष्ट्रातील विद्वजड ग्रंथात लपलेला नवमतवाद अत्र्यांनी घराबाहेर काढला. एरवी आगरकरांचे लेख मध्यमवर्गीयांच्या कपाटातच बंदिस्त राहणारे. 'तुझे आहे तुजपाशी' मध्ये काकाजी दिलखुलास दिसत असले तरी पुरोगामी महारारा‌ष्ट्राबाहेर सामंतवाद इंदूरचे आहेत हे लक्षात घ्यावे लागते. शतकाच्या अखेरीस तेंडुलकर, दळवी, आळेकर यांच्यानंतर नाट्यनुभाचा मोठा पट मांडण्याचे श्रेय महेश एलकुंचवार यांना द्यावे लागते. त्यांच्या 'वाडा चिरेबंदी' नाट्यत्रयीपासून तर आत्मकथा पर्यंतचा प्रवास सॉलिड आहे.

रत्नाकर मतकरी यांच्या लोककथा 78 आणि तनमाजोरी या नाटकावरून हेच सिद्ध होते की, मराठी नाटकावरही दलित आत्मकथनांचा प्रभाव पडलेला आहे. मुळात नाटक लोकाभिमुख असा प्रायोगिक वाङ्मयप्रकार आहे. सर्व पातळीवरच्या सामाजिक बदलांची नोंद म्हणूनच इतर वाङ्मयप्रकारापेक्षा नाटकात अधिक घेतलेली दिसते.

**कथांची कहाणी**

भारतासारख्या प्राचीन संस्कृती लाभलेल्या मराठी माणसांचे अवघे जग कुठल्यातरी कथांशी बांधलेले असते. तरीही विसाव्या शतकात कादंबरी आणि कवितेप्रमाणे कथेनेही नवे रूप धारण केले. वि. सौ. गुर्जरांपासून प्रारंभ झालेल्या शतकातील कथा मेघना पेठेपर्यंत नवनवी वळणी घेताना दिसते. प्रत्येक वळणापाशी मानवी भावनांचे वेगळे नाट्य वेगळ्या तरलतेने तरंगताना दिसते. य. मो. जोशी, दिवाकर कृष्ण, र. वा. दिघे, श्री. म. माटे, शंकर पाटील, मधु मंगेश कर्णिक या प्रत्येकाची कथा स्वतःचे वेगळे रूप घेऊन वेगळी कथा आकारास आली. चि. वि. जोशींची कथा पुण्यातल्या मध्यमवर्गीयांच्या परिघात निखळ आनंद देणारी विनोद कथा म्हणून, या शतकातील एकमेवाद्वितीय ठरली. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, वामन चोरघडे, शांताराम, विद्याधर पुंडलिक आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी बदलत्या जीवनशैलीतील मूल्यऱ्हास आणि मनाच्या डोहात उमटणारी काळीशार प्रतिबिंब चित्रित करण्याचा प्रयत्न केला. नवकथेचे सर्व सामर्थ्य अखेर एकवटले ते जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेत. पण ज्या देशात वर्णव्यवस्था, अस्पृश्यता आणि धार्मिक सनातनत्व प्रचंड प्रमाणावर मानसिक जडणघडण करते त्या माणसाला खऱ्या अर्थाने कथात्मक रूपात उभे करण्यात मराठी कथा पुरेशी यशस्वी झालीच नाही. बाबुराव बागुल किंवा केशव मेश्राम यांच्या कथांतील वेदना संपूर्ण मराठी कथांची वेदना का होऊ शकली नाही, याची कारणमीमांसा केली तर त्याचे उत्तर महात्मा फुले यांनी दीडशे वर्षापूर्वी विचारलेल्या प्रश्नांमध्ये मिळते. मराठी, मराठी ज्या राष्ट्रसमूहाला आपण संबोधतो त्या मराठी भाषिक समूहाने आपले म्हणावे असे या शतकाभरातील लिखित मराठी साहित्यात काय आहे? या प्रश्नाचे उत्तर वेदनादायक आहे. इतिहाहासाचार्य राजवाडे, लक्ष्मणशास्त्री जोशी आणि डॉ. वि. भि. कोलते या संशोधकांनी केलेल्या वैचारिक उत्खननामुळे मराठी माणसाला केवळ बौद्धिक नव्हे तर लौकिक विकासाची वाट सापडली. फुले, आंबेडकरांच्या चळवणीने ज्यांना नव्वद टक्के ग्रामीण, स्त्री, दलित आणि शोषितांना पहिल्यांदा हाती पाटी व पुस्तक दिले, त्या सर्व बहुजनांच्या माणसांचे दर्शन विसाव्या शतकातील मराठी साहित्यातून खऱ्या अर्थाने होत नाही. एखादी बळी सारखी, धग सारखी कादंबरी वगळली, वामन निंबाळकरची माय वगळली तर विसाव्या शतकातील मराठी साहित्य बोरूबहाद्दर पंतोजी आणि लेखणीबहाद्दर कारकुनी यांच्या विश्वातच घोटाळत असताना दिसते. म्हणून विसाव्या शतकातील मराठी साहित्य हे समृद्ध आहे. समकालीन युगसंवेदना पेलून धरण्याइतपत प्रगल्भ आहे पण बहुसंख्याचे मराठी माणूस या साहित्यातून अंशतःच प्रकटताना दिसते.

थोडक्यात, मराठी साहित्याचे विकसित दालन म्हणजे विविध कालखंडातील साहित्यिकांनी समाजाच्या गरजेनुसार विचारांना, भावनांना आणि वास्तवाला दिलेली कलात्मक आणि वैचारिक अभिव्यक्ती होय.

**संदर्भ साधने**

1) जोशी, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड 12 वा, म. रा. मराठी विश्वकोश मंडळ, म. रा. सा. व. सं. मंडळ प्रकाशन मुंबई, 1976

2) जोग, ल. ग. कादंबरी, चिरंजीव प्रका. पुणे, प्र. आ. 1963

3) कुरुंदकर, नरहर, धीर आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, 1971

4) देशपांडे, कुसुमावती मराठी कादंबरी : पहिले शतक मु. म. ग्रंथ मुंबई, 1975

5) नेमाडे, भालचंद्र मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप पाप्युलर प्रका. मुंबई

6) कवठेकर, बाळकृष्ण, दलित साहित्य : एक आकलन अजब पुस्तकालय, कोल्हापूर 1981

**Citation:** **बनपूरकर. डॉ. हि.,** (2026) "मराठी साहित्याचे विकसित दालन", *Bharati International Journal of Multidisciplinary Research & Development (BIJMRD)*, Vol-4, Issue-04(1), April-2026.